# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर शहरात विविध ठिकाणी म.न.पा. मालमत्तेवर एकुण ७८
**{आकाशचिन्ह विभाग}** ठिकाणी स्वतंत्र आकाशचिन्ह उभारून प्रदिर्शत करण्यास ई-निविदा (e-Auction) प्रक्रीयेव्दारे जाहिरातीचे हक्क प्रदान करणेकरीताचा प्रस्ताव मंजुर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिपणी :-

१. नागपूर शहरात विविध ठिकाणी म.न.पा. मालमत्तेवर आकाशचिन्ह उभारून प्रदिर्शत करण्यास ई-निविदेव्दारे एकुण १५१ ठिकाणी स्वतंत्र पचेविस (२५) गृप निहाय जाहिरातीचे हक्क प्रदान करण्यासंबंधात दोनदा ई-निविदा सुचना वर्तमानपत्रात तथा शासनाचे सांकेकीत स्थळ, www.maharashtratenders.gov.in वर प्रकाशित करण्यात आली असता एकाही निविदाकारानी भाग घेतलेला नाही.

२. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्य उप-विभाग, दिनांक ९ मे २०२२ अन्वये महानगरपालिका अधिनियम, [आकाशचिन्हे (स्काय साईन) व जाहिरात प्रर्दशित करण्याचे नियमन आणि नियंत्रण] नियम, २०२२ लागू करण्यात आले आहे.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, [आकाशचिन्हे (स्काय साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण] नियम, २०२२ मधील नियम ५ मधील-

(घ) “सार्वजनिक खुली जागा म्हणजे मनोरंजनाची मैदाने, क्रीडांगणे, उद्याने, बगिचे यामध्ये कोणताही जाहिरात फलक लावण्याची परवानगी दिली जाणार नाही.

(ण) “पदपथावर आणि सार्वजनिक रस्त्यावर कोणताही जाहिरात फलक किंवा जाहिरात प्रदर्शित करण्यात येणार नाही”

४. वरील अटीनुसार म.न.पा. मालमत्तेवर आकाशचिन्हे जसे ईमारत, नाला, सार्वजनिक खुली जागा येथील एकुण ७५ जागेवरल आकाशचिन्हे फलकांकरीता निविदा प्रक्रीयेव्दारे वाटप करणे करीता प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

५. परंतु पथपदावरील एकुण ७५ आकाशचिन्हे फलकांबाबत मा. आयुक्त महोदय यांचे अध्यक्षतेखली दिनांक ०७.०२.२०२४ रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार पथपदावरील आकाशचिन्हे फलकांचे सर्व्हेक्षण करण्याकरीता तसेच आकाशचिन्हे फलके पथपदावर आहेत परंतु पादचारी अवागमनला अडथळा होणार नाही हे निश्चित करून घेणे करीता खालील प्रामणे अधिकारी/कर्मचा-यांची समिती गठीत करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मिलींद मेश्राम, उपायुक्त (महसुल) | – अध्यक्ष |
| २. | श्री. रविंद्र बुंधाडे, वाहतु अभियंता, म.न.पा. | – सदस्य |
| ३. | श्री. जितेंद्रसिंह तोमर, कनिष्ठ निरिक्षक, आकाशचिन्हे परवाना विभाग | – सदस्य |
| ४. | श्री. चंद्रशेखर बागल, वरिष्ठ लिपीक, आकाशचिन्हे परवाना विभाग | – सदस्य |

६. वरील प्रमणे पथपदावरील एकुण ७५ आकाशचिन्हे फलकांचे सर्व्हेक्षण दिनांक ०५.०३.२०२४ व ०६.०३.२०२४ रोजी करण्यात आले असुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्यात आला असुन नस्तीत संलग्न आहे. कृपया अवलोकन व्हावे.

७. उक्त अहवालानुसार एकुण ७५ आकाशचिन्हे फलकांपैकी ७२ आकाशचिन्हे फलके आकाशचिन्हे फलके पथपदावर आहेत परंतु पादचारी अवागमनला अडथळा होणार नाही अशी आहे. तसेच या व्यतीरिक्त साईट क्र. १३, ७१, ७२, ७३, ११७, १५६ असे ६ (सहा) ठिकाण असे आहे जे वरील ७५

चे यादीत समाविष्ठ करण्यात आले नव्हते परंतु या सहाही ठिकाण पादचारी अवागमनला अडथळा होणार नाही अशी असल्याचे सर्व्हेक्ष दरम्यान निदर्शनास आले आहे.

८. करीता अशा एकुण ७८ आकाशचिन्हे फलकांचे निविदा/ लिलाव प्रक्रीयेव्दारे वाटप करणे योग्य होईल असे वाटते आणि त्या नुसार निविदा प्रपत्र तयार करण्यात आले असुन निविदा प्रक्रीया राबविणेची अनुमती देणेचा प्रश्न विचारात घेणे.

सविस्तर माहिती नस्तीत संलग्न आहे.

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 844/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 15/03/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (महसूल), आकाशचिन्ह विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहरात विविध ठिकाणी म.न.पा. मालमत्तेवर एकुण ७८ ठिकाणी स्वतंत्र आकाशचिन्ह उभारून प्रदिर्शत करण्यास ई-निविदा (e-Auction) प्रक्रीयेव्दारे जाहिरातीचे हक्क प्रदान करणेकरीताच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.